आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२२ ऑगस्ट २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवण्याची गरज मुख्यमंत्र्यांकडून व्यक्त

- शेतकऱ्यांना तातडीनं मार्गदर्शन मिळावं यासाठी 'किसान कॉल सेंटर' सुरू करण्याची कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची सूचना

- एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांना पाठिंबा द्यायला शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचा नकार

**आणि**

- राज्यभरात बैलपोळ्याचा सण पारंपरिक पद्धतीनं साजरा

**<><><><><>**

२०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवण्याची गरज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज व्यक्त केली.  राष्ट्रीय आणि राज्य महिला आयोगानं आयोजित केलेल्या शक्तिसंवाद या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. आर्थिक परिवर्तनासाठी महिलांचं शिक्षण आणि रोजगार आवश्यक आहे. सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचा रस्ता लिंग समतेतूनच जातो, असं सांगून केंद्र आणि राज्य सरकारनं महिलांसाठी राबवलेल्या विविध योजनांचा उल्लेख त्यांनी केला. महिलांचा सन्मान फक्त पुस्तकातून शिकवून चालणार नाही, तर आपल्या वागणुकीतून घरातल्या लहान मुलांना ते शिकवायला हवं, यावर त्यांनी भर दिला. एक कोटी महिलांना लखपती दीदी करण्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**<><><><><>**

शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि अभियानांची प्रभावी अंमलबजावणी करून जनसामान्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणावं, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी यंत्रणांना दिले आहेत. ते आज मुंबईत सामाजिक क्षेत्र वॉर रूममधल्या योजनांच्या आढावा बैठकीत बोलत होते. केंद्रीय योजनांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र कुठंही मागं पडू नये, याबाबत यंत्रणांनी सतर्क राहावं, अशा सूचना त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत अमृत अभियानाचा दुसरा टप्पा, १५व्या वित्त आयोगाच्या निधीतून पायाभूत आरोग्य सुविधा, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सोयी सुविधा मिशन, या योजनांचा विस्तृत आढावा घेतला.

**<><><><><>**

शेतकऱ्यांना तातडीनं मार्गदर्शन मिळावं यासाठी 'किसान कॉल सेंटर' सुरू करण्याची सूचना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली आहे. त्यांनी आज पुण्यात कृषी विभागाची आढावा बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. विभागाच्या डिजिटायझेशनवर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. कृषी योजनांची आखणी करताना शेतकऱ्याच्या गरजांचा विचार केंद्रस्थानी असला पाहिजे, असं ते म्हणाले. उत्तम काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचं कौतुक आणि सन्मान केला जाईल, मात्र, कामात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा भरणे यांनी दिला.

**<><><><><>**

राज्य महोत्सव असलेल्या गणेशोत्सवात लोकसहभाग वाढवण्यासाठी सर्व सरकारी विभागांनी विविध उपक्रम राबवावे, अशी सूचना सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध उपक्रमांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत आज केली. मुंबईच्या रस्त्यांवरचे खड्डे गणेशोत्सवापूर्वी भरा, असे

निर्देशही त्यांनी मुंबईतल्या यंत्रणांच्या आढावा बैठकीत दिले. गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिल्यानिमित्त विविध उपक्रमांचा भाग म्हणून भजन साहित्याच्या खरेदीसाठी राज्य सरकार सुमारे १ हजार ८०० भजनी मंडळांना प्रत्येकी २५ हजार रुपये अनुदान देणार आहे. यासाठी उद्यापासून ०६ सप्टेंबरपर्यंत mahaanudan.org या वेबसाइटवर अर्ज करावे लागतील.

<><><><>

पुण्याच्या गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीसंदर्भात निर्माण झालेल्या वादावर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज सर्व मंडळांची एकत्रित बैठक घेत तोडगा काढला. मिरवणूक सकाळी साडेनऊ वाजता सुरू होऊन यंदाही परंपरेनुसार आणि दरवर्षीच्या क्रमाने मिरवणूक होईल असा निर्णय यावेळी सर्व मंडळांनी एकमतानं घेतला. काही मंडळांनी नियोजित वेळेआधीच विसर्जन मिरवणुकीत सहभाग घेण्याचा निर्णय घेतल्याने वाद निर्माण झाला होता.

<><><><>

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांना पाठिंबा द्यायला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं नकार दिला आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. राधाकृष्णन यांना पाठिंबा द्यावा अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केली होती, मात्र आपली विचारसरणी वेगळी आहे, असं कारण त्यांनी दिलं. सी. पी. राधाकृष्णन झारखंडचे राज्यपाल असताना मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अटक करण्यात आली, याचा उल्लेखही त्यांनी केला. शिरूर-हवेली, हडपसर यासह राज्यातल्या इतर विधानसभा मतदारसंघातल्या मतदार यादीत घोटाळा झाल्याचा आरोप पक्षानं केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून राज्यातल्या मतदारयाद्यांचा

अभ्यास सुरू केल्याची माहिती पवार यांनी दिली. याविरोधात जनआंदोलन करणार असल्याचं आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले.

**<><><><><>**

राज्यभरात आज बैलपोळ्याचा सण उत्साहात साजरा झाला. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा केला जातो. राज्याच्या विविध भागांमध्ये हा सण कसा साजरा झाला, याची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी-***

*आज **परभणी**मध्ये मोठ्या उत्साहात बैलपोळ्याचा सण साजरा झाला. **यवतमाळ**मध्ये नगरपरिषदेनं भरवलेल्या बैलपोळा सोहळ्यात उत्कृष्ट बैलजोड्यांना बक्षिसं देण्यात आली. **गोंदिया**मध्ये गावागावांत आज झडत्या म्हणत भर पावसांत पोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. **भंडारा** जिल्ह्यातल्या डोकेसरांडी या गावात आधुनिक पद्धतीनं ट्रॅक्टर पोळ्याचा सण साजरा झाला. गावातले सर्व ट्रॅक्टर्स एकत्र आणून, बदलत्या तंत्रज्ञानानुसार बैलजोड्यांची जागा घेणाऱ्या ट्रॅक्टर्सचा पोळा इथं भरवला गेला. **नाशिक** जिल्ह्यावर ओल्या दुष्काळाचं सावट असूनही ग्रामीण भागात शेतकऱ्यांनी बैलपोळ्याची परंपरा कायम राखली. **नंदुरबार** जिल्ह्यातल्या ब्रदिझिरा गावातल्या बंजारा समाजाने तयार केलेल्या गोंड्यांच्या सजावटीला पोळ्याच्या दिवशी पंचक्रोशीतून विशेष मागणी होती. **हिंगोली** जिल्ह्यात विवाहविधीसह पारंपरिक पद्धतीने पोळा साजरा झाला. वसमत तालुक्यात वाई गोरखनाथ इथं दरवर्षीप्रमाणे पोळ्याचा कर निमित्त परंपरागत महापोळा उद्या भरणार आहे. यात प्रदक्षिणा घालण्यासाठी १५ हजारांपेक्षा जास्त बैलजोड्या सहभागी होण्याचा अंदाज आहे. **नागपुरात** उद्या तान्हा पोळ्याच्या निमित्ताने १४४ वर्षांचा इतिहास असलेली भव्य मुखवट्यांची काळी पिवळी मारबत मिरवणूक निघणार आहे.*

**<><><><><>**

गणपतीसाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांमुळं ५ हजार १०३ जादा बस फुल्ल झाल्या आहेत. एकूण ५ हजार २०० बस एसटी महामंडळ सोडणार आहे. मुंबई, ठाणे आणि पालघर विभागातून या बस निघणार असल्याची माहिती एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. यात प्रवाशांना विविध प्रकारच्या सवलती मिळणार आहेत.

**<><><><><>**

पुण्यातील लोणावळा खंडाळा या प्रसिद्ध पर्यटन स्थळांसह अनेक ठिकाणांना पर्यटकांकडून पसंती मिळते. मात्र, अनियंत्रित आणि बेजबाबदार गर्दीमुळे अनेकदा छोट्या मोठ्या स्वरूपाच्या दुर्घटना आणि अपघात घडतात. हे टाळण्यासाठी जिल्ह्यातील महत्त्वाच्या 22 पर्यटन स्थळांवर जाण्यापूर्वी ऑनलाइन बुकिंग अनिवार्य करण्याचा निर्णय पुणे जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. या ठिकाणांमध्ये सिंहगड किल्ला, अंधारबन, राजगड, तोरणा, कामशेत, शिवनेरी किल्ला, मढे घाट, यासह विविध ठिकाणांचा समावेश आहे. या ठिकाणांवर मर्यादित संख्येने पर्यटकांना प्रवेश दिला जाणार आहे.

**<><><><><>**

राज्याच्या बहुतांश भागांत पावसानं विश्रांती घेतली आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात कालपासून पावसाने उघडीप दिली. यामुळे पंचगंगेच्या पाणी पातळीत घट होत असून पूरबाधितांना दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यातले राष्ट्रीय महामार्ग सुरू आहेत पण ८ राज्य महामार्गांसह एकंदर ५० रस्ते पाणी साचल्यामुळे बंद आहेत. पर्यायी मार्गावरून वाहतूक सुरु आहे.

**पैठणच्या** नाथसागर धरणातला पाणीसाठा ९६ टक्क्यांच्या वर गेला असून धरणाचे १८ दरवाजे उघडून विसर्ग सुरु आहे. विसर्गामुळे गोदावरी नदीचं पाणी वाढलं असून त्यामुळे बीड जिल्ह्यात गेवराई तालुक्यातलं राक्षसभुवनचं शनिमंदिर पाण्याखाली गेलं आहे.

**सांगली** जिल्ह्यात कोयना आणि वारणा धरणातून विसर्ग कमी करण्यात आला आहे. कृष्णा नदीची पातळी हळूहळू कमी होत आहे.

विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज **हिंगोली** जिल्ह्यात पूरग्रस्त भागाची पाहणी केली आणि प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी केली.

**नांदेड** जिल्ह्यात पुरामध्ये १००च्या वर जनावरं दगावली आहेत. पुरामुळे उर्वरित पशूंना रोगाची लागण होऊ नये यासाठी जिल्हा पशुधन केंद्रांमध्ये लसीकरण सुरू आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, विदर्भात उद्या बऱ्याच ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र  आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><>//